Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,
*Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2017: 5.068, www.srjis.com*
*PEER REVIEWED JOURNAL, DEC-JAN 2019, VOL- 7/31*

# मराठी विषयात मुद्दयांवरून गोष्टीचे लेखन करताना येणाऱ्या समस्या व त्यावर संकलित कथा वाचन व लेखन या अध्ययन तंत्राच्या परिणामकारकतेचा अभ्यास

**शुभांगी सूर्यकांत कुऱ्हाडे, Ph. D.**

*अध्यापक महाविद्यालय, अरण्येश्वर पुणे ९*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## ➢ प्रस्तावना –

शालेय अभ्यासक्रमात शिक्षणाची राष्ट्रीय ध्येय आणि उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अनेक विषयांचा समावेश केला आहे. अभ्यासक्रमात भाषा, गणित, विज्ञान, स.शास्त्र, चित्रकला, शारीरिक शिक्षण, कार्यानुभव इ. विषयांचा समावेश आहे. यातूनच शिक्षक भारताचा आदर्श भावी नागरिक घडवत असतो. किंबहुना ' शिक्षण म्हणजे मुलांच्या सर्वांगिण शक्तीचा विकास साधने होय' आणि हा सर्वांगसुंदर विकास साधण्यासाठी भाषेच्या ज्ञानाची उपयुक्तता फार मोठी आहे.

आज शिक्षण क्षेत्रात प्रचंड प्रमाणात प्रगती झालेली आहे. या आधुनिक युगात शिक्षणात भाषा हा अविभाज्य घटक बनलेला आहे. जीवनावश्यक शिक्षण सर्वांना घेता यावे म्हणून औपचारिक पध्दतीने शाळेतून शिक्षण दिले जाते. शासनाच्या वतीने आता ६ ते १४ या वयोगटातील प्रत्येक बालकाला सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. या सगळयाचा परिणाम म्हणून विद्यार्थ्यांची व शाळांची संख्या वाढलेली आहे. मातृभाषा , स्थानिक भाषा म्हणून मराठी विषयाचा सर्व अभ्यासक्रम मंडळांनी समावेश केलेला आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांची संख्या ही जास्त प्रमाणात वाढल्यामुळे शाळेतील तुकडयांची संख्यादेखील वाढविण्यात आलेली आहे. तसेच शाळेमध्ये वेगवेगळया विषयानुसार शिक्षकांची संख्या देखील वाढविण्यात आलेली आहे. परंतु जास्त विद्यार्थीसंख्येचा विचार करता, विद्यार्थ्यांच्या बुद्धीमत्तेच्या दृष्टिकोनातून, संपादनात पडणारा फरक विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासात बदल झालेले दिसतात.

## ➢ संशोधनाची गरज व महत्व :

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

विद्यार्थ्यांना मुद्दयांवरून गोष्टीचे लेखन करताना अनेक समस्या येतात.वर्गातील अत्यल्प विद्यार्थी परीक्षेत मुद्दयांवरून गोष्टीचे लेखन करताना आढळून आले. जे विद्यार्थी मुद्दयांवरून गोष्टीचे लेखन करतात त्यातही काही व्याकरणदृष्टया चूका आढळतात .त्या चूका दुरूस्त करून जास्तीत जास्त विद्यार्थी मुद्दयांवरून गोष्टीचे लेखन करतील .विद्यार्थ्यांमध्ये मुद्दयांवरून गोष्टीचे लेखन करण्याची भिती दूर होवून कथा लेखनाबद्दल अभिरूची निर्माण होण्यास मदत होईल . इयत्ता आठवीतच विद्यार्थ्यांच्या मुद्दयांवरून गोष्टीचे लेखन करताना होणाऱ्या चुकांकडे लक्ष दिले तर विद्यार्थी इयत्ता दहावीपर्यंत मुद्दयांवरून गोष्ट लेखन या कौशल्यात उत्तम संपादन साध्य करतील.

मानवाच्या आत्मप्रकटीकरणाचे महत्त्वाचे साधन म्हणजे मातृभाषा होय.भाषेचे व्याकरण ज्ञात झाले, परंतु आकलन नीट झालेले नसेल तर भाषेचे उपयोजन करताना अडचणी येतात. त्यामुळे लेखनकौशल्य ,संभाषण कौशल्य परिणामकारक होत नाही.

मानव आपल्या जन्मापासून जी भाषा ऐकतो , व बोलतो ती आपली मातृभाषा असते. व्याकरण हा भाषेचा आत्मा आहे.व्याकरणाशिवाय आपण भाषेचे परिपूर्ण ज्ञान घेवू शकत नाही. दिलेल्या विषयावर मुद्दयांवरून गोष्टीचे लेखन करावयाचे असते. मुद्दयांवरून गोष्टीचे लेखनात करण्यासाठी योग्य कृतीकार्यक्रम राबविले तर लेखन करताना येणाऱ्या समस्या दूर होतातच परंतु त्याचबरोबर मराठी वाचन , लेखन ,संभाषण ,कौशल्यांचा विकास होतो.

- सैद्धांतिक पार्श्वभूमी :
  - कथालेखन म्हणजे गोष्ट रचून ती लिहून दाखविणे.
  - गोष्ट लेखन करताना भाषा सुटसुटीत व चटकदारा असावी.
  - गोष्टीची सुरूवात आकर्षक असावी.
  - गोष्टीचा शेवट परिणामकारक असावा.
  - गोष्टीची सुरूवात , शेवट अर्थपूर्ण, समन्वय साधणारा असावा.
  - प्रत्येक गोष्टीला आरंभ , मध्य, शेवट असे तीन भाग असतात.
- गोष्ट लेखन प्रकार :

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

- एखादी गोष्ट ऐकून ती परत तुमच्या भाषेत पुन्हा लिहिणे.
- एकापुढे एक अशी काही चित्रे पाहून त्यावरून गोष्ट लेखन करणे.
- एखादी गोष्ट अर्धीच सांगून ती पूर्ण करणे.
- गोष्टीचे शीर्षक,प्रसंग किंवा म्हण देऊन गोष्ट लेखन करणे.
- गोष्टीतील काही मुद्दे क्रमाने देऊन त्या मुद्दे / आराखडा/रूपरेषेवरून गोष्टलेखन करणे.

**मुद्दे /आराखडा किंवा रुपरेषेवरून गोष्ट लेखन करणे :**

**यात कथेतील प्रमुख घटना , आरंभ व शेवट दिलेला असतो.**

**कथा कशी आकर्षक सांगायची हे ज्याचे त्याने ठरवावयाचे असते.**

**शब्द किंवा मुद्दयांचा धागा घेउन कथानकाचे सुंदर वस्त्र विणताना त्यात कल्पनेची पुष्कळशी भर टाकायची व आपली कथा आकर्षक लिहायची किंवा सांगायची.**

➢ **संशोधनाची उद्दिष्टे–**

**१.इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना मराठी विषयात मुद्दयांवरून गोष्टीचे लेखन करताना येणाऱ्या समस्यांचा शोध घेणे.**

**२.इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना मराठी विषयात मुद्दयांवरून गोष्टीचे लेखन करताना येणाऱ्या समस्यां दूर करण्यासाठी संकलित कथा वाचन व लेखनया अध्ययन तंत्राचे नियोजन करणे.**

**३.इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना मराठी विषयात मुद्दयांवरून गोष्टीचे लेखन करताना येणाऱ्या समस्यां दूर करण्यासाठी संकलित कथा वाचन व लेखन अध्ययन तंत्राची अंमलबजावणी करणे.**

**४. संकलित कथा वाचन व लेखन या अध्ययन तंत्राचा मुद्दयांवरून गोष्ट लेखन**

कौशल्यावरील परिणामकारकता तपासणे.

➢ संशोधनाची परिकल्पना –

प्रस्तुत संशोधनासाठी परिकल्पना खालीलप्रमाणे आहेत.

➢ शून्य परिकल्पना –

इयत्ता आठवीच्या विद्यार्थींनीना मराठी विषयात मुद्दयांवरून गोष्ट लेखन करताना येणाऱ्या समस्यां दूर करण्यासाठी संकलित कथा वाचन व लेखन या अध्ययन तंत्रांच्या परिणामस्वरूप पूर्व व उत्तरचाचणीत मुद्दयांवरून गोष्ट लेखन संपादनाच्या मध्यमानात ०.०१ सार्थता स्तरावर फरक पडणार नाही.

➢ निर्देशित परिकल्पना –

इयत्ता आठवीच्या विद्यार्थींनीना मराठी विषयात मुद्दयांवरून गोष्ट लेखन करताना येणाऱ्या समस्यां दूर करण्यासाठी संकलित कथा वाचन व लेखन या अध्ययन तंत्रांच्या परिणामस्वरूप पूर्व व उत्तरचाचणीत मुद्दयांवरून गोष्ट लेखन संपादनाच्या मध्यमानात ०.०१ सार्थता स्तरावर सार्थ फरक दिसून येईल.

➢ कार्यात्मक व्याख्या :

➢ मराठी विषय :–महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निमिर्ती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे अंतर्गत मराठी माध्यमातील माध्यमिक स्तरावरील इयत्ता ८ वी साठी प्रथम भाषा विषय.

  ➢ मुद्दयांवरून गोष्ट लेखन – शब्द किंवा मुद्दयांचा धागा घेऊन कथानकाचे सुंदर वस्त्र विणताना त्यात कल्पनेची पुष्कळशी भर टाकायची व कथा स्वत:च्या भाषेत आकर्षक लिहायची .

  ➢ परिणामकारकता – संकलित कथा वाचन व लेखन या अध्ययन तंत्राच्या वापराने विद्यार्थ्यांच्या संपादनात झालेली संख्यात्मक व गुणात्मक वाढ म्हणजे परिणामकारकता होय.

- संशोधनाच्या परिमर्यादा

१.प्रस्तुत संशोधन मराठी विषयापुरते मर्यादित होते.

२.प्रस्तुत संशोधन हे इयत्ता ८ वी मराठी विषयातील मुद्दयांवरून गोष्टींचे लेखन या घटकापुरतेच मर्यादित होते.

३. प्रस्तुत संशोधन हे गेनबा सोपानराव मोझे माध्यमिक विद्यालय , येरवडा या शाळेपुरतेच मर्यादित होते.

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

४.प्रस्तुत संशोधन हे इयत्ता ८वीच्या तुकडी अ च्या २० विद्यार्थीनीनीपुरतेच मर्यादित होते.

५. प्रस्तुत संशोधन हे शैक्षणिक वर्ष २०१८ – २०१९ पुरतेच मर्यादित होते.

- **संशोधन पध्दती :**
  - ➢ प्रस्तुत संशोधनात मुद्दयांवरून गोष्ट लेखन करताना, विद्यार्थीनींकडून होणाऱ्या चुका तसेच शिक्षकांना जाणवणाऱ्या समस्यांचा शोध घेण्यासाठी सर्वेक्षण पध्दती वापरलेली होती.
  - ➢ प्रस्तुत संशोधनात मुद्दयांवरून गोष्ट लेखन करताना, जाणवणाऱ्या समस्या दूर करण्यासाठी संशोधकाने प्रायोगिक पध्दतीचा वापर केलेला होता.
  - ➢ प्रस्तुत संशोधनात एकलगट अभिकल्पाचा वापर केलेला होता.
- **जनसंख्या व नमुना.**

प्रस्तुत संशोधनात गेनबा सोपानराव मोझे माध्यमिक विद्यालय , येरवडा येथील इयत्ता ८ वीचे मराठी विषयाचे अध्ययन करणाऱ्या २० विद्यार्थीनी असंभाव्यता नमुना निवड पध्दतीतील सहेतूक न्यादर्शन पध्दतीने निवडलेल्या होत्या.

- **संशोधनाचे वेगळेपण :**

सबंधित व प्रस्तुत संशोधनात अभ्यास पध्दती प्रायोगिक पध्दती आहे. सबंधित व प्रस्तुत संशोधन मराठी विषयातील लेखन कौशल्याशी संबंधित आहे. प्रस्तुत संशोधन हे मुद्यांवरून गोष्ट लेखन कौशल्य विकसनावर असून फक्त विद्यार्थीनींवरच अमंलबजावणी केलेली आहे. मुद्दयावरून गोष्ट लेखन कौशल्य विकसनासाठी संकलित कथा वाचन व लेखन हे तंत्र वापरलेले होते. या संशोधनात विद्यार्थ्यांना लेखनासाठी , विचार करण्यासाठी ,सरावासाठी वेळ दिलेला होता. हे प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण आहे.

**३.८ संशोधनाची कार्यवाही:**

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies




**प्रस्तुत संशोधनाची कार्यवाही करताना प्रथमत: विद्यार्थीनींना प्रत्येकी कमीत कमी १० गोष्टी संकलित करावयास सांगितल्या. संकलित गोष्टी वाचून गटात सांगितल्या.त्या गोष्टी विद्यार्थीनींनी स्वत:च्या भाषेत सांगितल्या.त्यामुळे गोष्टींची सुरूवात , मध्य व शेवट विद्यार्थीनीना समजला. इयत्ता ८ वीच्या विद्यार्थीनींना कथालेखन सोपे वाटले. मुद्दयावरून गोष्ट लेखन कौशल्य विकसनासाठी कथेसाठी मुद्दे देऊन विद्यार्थीनीकडून गोष्ट लेखन करून घेतले. मुद्दयावरून गोष्ट लेखनासंबंधी मार्गदर्शन केले.**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

दिलेल्या शब्दांचा किंवा मुद्दयांचा धागा घेऊन कथानकाचे सुंदर वस्त्र विणताना त्यात कल्पनेची पुष्कळशी भर टाकायची व आपली कथा आकर्षक करण्याच्या क्लृपत्या सांगितल्या.

- मुद्दयावरून गोष्ट लेखन करताना खालील बाबी लक्षात ठेवणे गरजेचे असते.

  गोष्ट लेखन करताना भाषा सुटसुटीत असावी.

  गोष्टीची सुरूवात आकर्षक असावी.

  गोष्टीचा शेवट परिणामकारक असावा.

  गोष्टीची सुरूवात , शेवट अर्थपूर्ण, समन्वय साधणारा असावा.

- मुद्दयावरून गोष्ट लेखनासाठी गुणदान योजना पुढीलप्रमाणे–

१. आकर्षक प्रस्तावना : १ गुण

२.तर्कसुसंगत व मुद्देसुद आशय : ३ गुण

३. भाषाशैली : २ गुण

४. शुध्दलेखन : १ गुण

५.अक्षरसौंदर्य : १ गुण

६. योग्य समारोप : १ गुण

७. योग्य शीर्षक : १ गुण

- प्रस्तुत संशोधनाचे माहिती संकलनाचे साधन :

मुद्दयावरून गोष्ट लेखनाचे अध्यापन केल्यानंतर व प्रायोगिक उपचारानंतर त्याचा परिणाम तपासण्यासाठी संपादन कसोटीचा वापर होता.संपादन कसोटीतून विद्यार्थ्यांचे ज्ञान, आकलन , उपयोजन ,कौशल्य इत्यादी अध्ययनाची उदिष्टे कितपत साध्य झाली हे तपासले.

- संख्याशास्त्रीय विश्लेषण:

| अ.न. | मध्यमान | प्रमाणविचलन | स्वाधीनता मात्रा | ‘ t’ परिक्षिकेद्वारे त्रुटींची संभाव्यता |
|---|---|---|---|---|

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पूर्वचाचणी | २.७ | ०.९ | १९ | १.४९९७४ E-२५ |
| उत्तर चाचणी | ७.७५ | ०.४३ | | |

- **शून्य परिकल्पना परीक्षण :**

वरील सारणीवरून मुद्दयावरून गोष्टीचे लेखन केल्यानंतर पूर्व व उत्तर संपादन चाचणीच्या गुणांची तुलना केली असता असे दिसते की ,

१.पूर्वचाचणीच्या तुलनेत उत्तरचाचणीचे मध्यमान अधिक आढळून आले.

२.N = 20 df – १९ साठी 't' परीक्षिकेची प्रमाण त्रुटींची संभाव्यता १.४९९७४ E–२५ एवढी आली. उत्तर चाचणीतील संपादन गुणांची तुलना द्विपुच्छ 't' परीक्षिकेच्या सहाय्याने केली आहे.'t' चे मूल्य Microsoft office Exel ने काढलेले आहे.

३. 't' परीक्षिकेची प्रमाण त्रुटींची संभाव्यता ही ०.०१ पेक्षा कमी आहे.त्यामुळे संशोधकास शून्य परिकल्पनेचा त्याग करून संबंधित संशोधन परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल.

- **निष्कर्ष :**

विश्लेषणानंतर मिळालेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे :

१. पूर्वचाचणीपेक्षा उत्तरचाचणीत लिहिलेल्या गोष्टी अत्यंत सरस होत्या. विद्यार्थीनीना मुद्दयावरून गोष्ट लेखनाचे तंत्र अवगत झाल्याचे दिसून आले.

२. विद्यार्थीनीनी विविध प्रकारच्या गोष्टी संकलित केल्यामुळे त्यांना गोष्टींचे स्वरूप समजले . त्यामुळे गोष्ट लेखनाचा आत्मविश्वास निर्माण झाला.

३.गोष्ट आकर्षक बनविण्यासाठी म्हणी , सुभाषिते , दाखले इत्यादीचा सरावानंतर वापर केलेला आढळला.

४.पूर्वचाचणीपेक्षा उत्तरचाचणीचे मध्यमान जास्त आले त्यावरून मुद्दयावरून गोष्ट लेखनात सुधारणा झालेली आढळून आली.

**संदर्भग्रंथ सूची–**

**मराठी पुस्तके –**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

*आगलावे, प्र.(२०००). संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे.( प्रथम आवृत्ती ).नागपूर : विद्या प्रकाशन.*

*घोरमोडे , के . यु घोरमोडे के.के. (२००७). शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे , नागपूर : विद्या प्रकाशन*

*जोशी , अ. (२००७). कृतीसंशोधन आराखडा व अहवाल लेखन : कार्यपुस्तिका. नाशिक : मे. श्री मुद्रनालय. पृष्ठ , १७–१९.*

*भिंताडे , वि. (२००४). शैक्षणिक संशोधन पध्दती.( सुधारित आवृत्ती )पुणे : नूतन प्रकाशन.*

*मुळे , रा. व उमाठे , वि. (१९९८). शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे. ( तृतीय आवृत्ती ). औरंगाबादः महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.*

*वाळंबे मो.रा. (द्वितीय आवृत्ती १९९५ ) सुगम मराठी व्याकरण , नितीन प्रकाशन : पुणे*

*गोविलकर,डॉ.ली . (तृतीय आवृत्ती १९९७) मराठी व्याकरण , मेहता पब्लशींग हाउस : पुणे*

*झांबरे, स.ध . (प्रथम आवृत्ती १९९७) मराठी व्याकरणाचा अभ्यास, नितीन प्रकाशन : पुणे*

*मासिके –*

*चव्हाण ,किशोर (ऑक्टो.ते डिसें). शिक्षणातील मर्मदृष्टी (संशोधन विशेषांक ).नाशिक : इनसाईट पब्लिकेशन्स.*

**संशोधने –**

*संशोधक : लेले, गा.ग., इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांना मराठी विषयातील वर्णनात्मक निबंधाचे लेखन करताना येणाऱ्या समस्या व उपक्रमाचे विकसन (अप्रकाशित कृतीसंशोधन अहवाल )*

*संशोधक : माने, र. वि., माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना मराठी विषयात निबंध लिहिताना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास (अप्रकाशित कृतीसंशोधन अहवाल)*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*